# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २८०/२०२४ दिनांकः- ३०/०७/२०२४.

## “पायी चालत येवुन जबरी चोरी करणाऱ्या आरोपीतास अटक करण्यास माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण पथकास यश”

----oo----

माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक २१/०७/२०२४ रोजी २०.४५ वा.चे सुमारास रिबेरा टॉवर, कौल हेरिटेज सिटी, अग्रवाल, वसई पश्चिम, जि. पालघर येथे यातील फिर्यादी हे पायी घरी चालत जात असता फिर्यादी यांचे पाठीमागुन एक अनोळखी इसम येवून त्याने अचानक फिर्यादी यांचे गळयातील अर्धवट सोन्याची मोहन माळ (चैन) ही जबरीने खेचून घेवून पळून गेलेबाबत तक्रारदार नामे तापसी राजेंद्र घोष, धंदा- गृहीणी रा. रुम.नं. ए/४०४, रिवेरा टॉवर, कॉल हेरीटेज सीटी, अग्रवाल, वसई प, ता वसई, जि पालघर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन माणिकपुर पोलीस ठाणे गु.र.क्र. २५०/२०२४ कलम ३०९ भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील आरोपीत याचा शोध घेणेकामी माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार तात्काळ घटनास्थळी भेट देवुन घटनास्थळावरुन सी.सी.टी.व्ही फुटेजच्या मदतीने तसेच मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे जवळपास ३०० ठिकाणचे सी.सी.टी.व्ही कॅमेरे तपासुन आरोपीत नामे इस्माईल शहाजान मुल्ला, वय ३३ वर्षे, रा. रुम नं. बी/२०४, सोहेल निवास बिल्डींग, साई बाजार, तुळींज - संतोषभुवन रोड, नालासोपारा पुर्व, जि. पालघर, मुळ रा. ग्राम बहरमपुर, पोस्ट बडा, ठाणा सिंगोर, जि. हुगळी, राज्य पश्चिम बंगाल याचा शोध घेवुन त्यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. आरोपीत याचेकडुन एकुण ४५,५००/- रु. किंमतीची ०९ ग्रॅम लगड व सोने वितळविण्याचे साहित्य हस्तगत करण्यात आल्या आहे.

सदरची कारवाई श्रीमती पौर्णिमा चौगुले/श्रिंगी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०२, श्री. नवनाथ घोगरे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई, श्री. राजु माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. संतोष चौधरी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पो.उ.नि./सनिल पाटील, पो.ह./शैलेश पाटील, शामेश चंदनशिवे, धनंजय चौधरी, पो.शि./गोविंद लवटे, आनंदा गडदे, प्रविण कांदे, म.पो.शि. पुजा कांबळे व पोलीस उप आयुक्त कार्यालय, परिमंडळ ०२ चे पो.ह./भालचंद्र बागुल, पो.शि./अमोल बर्डे, मोहन खंडवी यांनी यशस्विरीत्या पार पाडली आहे.

--------oooo--------